# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र खंडपीठ, पुणे

अपील/पुणे १८६८
क्र रा.मा.आ./~~आ.क्र.२२९४~~/ /२००८
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र खंडपीठ,
पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.
दुरध्वनी : २६०५०६३२-३३/२६०५०५८०
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिनांक :- २९ / ०३/२००८

प्रति,

श्री. अच्युत कृष्ण जातेगांवकर
मु.पो. जातेगांव खुर्द, ता.शिरूर जि.पुणे .

विषय : माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये द्वितीय अपील
संदर्भ - आपले दि. १९/०३/२००८ चे अपील

महोदय,

आपले विषयाधीन द्वितीय अपीलाची तपासणी केली असता प्रस्तुत अपीलांचा विषय माहिती अधिकार आधिनियमातंर्गत येत नसल्याने आपले अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मला मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांच निर्देश आहेत.

आपला

(स्वाक्षरी)

(रा.म.गेंगजे)
कक्षअधिकारी
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र खंडपीठ पुणे

२७/३/०८

प्रती,

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे.
२) जन माहिती अधिकारी, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ यांना माहितीस्तवअग्रेषित

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. शरद रामण्णा शेट्टी<br>प्लॉट क्र. १४, वीरभद्र नगर, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे-४११ ०४५ |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हाधिकारी पुणे यांचे प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |

अपीलकर्ता गैरहजर. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ अंतर्गत जाहीर करावयाची माहिती सदर कार्यालयाने प्रसिध्द केलेली आहे. तसेच आवश्यक ती माहिती देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कळवूनही अपीलकर्ता हजर रहात नाहीत व शुल्क भरत नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही. आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. कलम ४ अंतर्गत स्वेच्छेने जाहीर करावयाची माहिती आहे, ती अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

**पुणे**
**दि. ३१.३.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भालचंद्र धनराज देवकर
मु.पो.लोणी देवकर, ता. इंदापूर
जि. पुणे ५ ४१३ १३२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित,
मुख्य शाखा, ४ब, बी. जे. रोड, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
इन. उपव्यवस्थापक,
बिगरशेती कर्ज विभाग,
पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित,
मुख्य शाखा, ४ब, बी. जे. रोड, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | -- |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | -- |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

लोणी देवकर वि.का. सोसायटीची सन २००३ ते जून २००६ पर्यंत पीक कर्ज वाटप व केलेल्या वसुलीची कार्यवाहीबाबत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. भालचंद्र धनराज देवकर यांनी सन २००३ ते जून २००६ पर्यंत लोणी देवकर वि.का.सोसायटीची पीक कर्ज वाटप व वसुलीची कार्यवाहीबाबत एकूण ५ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेकडील प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. देवकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने दि. २६.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना अपिलांच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली होती. आपल्याला आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत श्री. देवकर यांनी दि. ११.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. ७.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.मधुकर रामचंद्र बवरे
भैरवनाथ दत्तनगरी, फ्लॅट नं.३४,
मु.पो.वडगाव, ता.मावळ, जि.पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषि सह-संचालक (आस्था.),
कृषि आयुक्तालय, पुणे-५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि उपसंचालक,
कर्मचारी कल्याण कक्ष, कृषि आयुक्तालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर रामचंद्र बवरे
भैरवनाथ दत्तनगरी, फ्लॅट नं.३४,
मु.पो.वडगाव, ता.मावळ, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि उपसंचालक,
कर्मचारी कल्याण कक्ष, कृषि आयुक्तालय, पुणे-१ श्री.सो.द.शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दिनांक १.१.१९८६ रोजी रु.५६० मूळ वेतनावर वेतननिश्चिती करावी. दि.१.९.१९९८ पासून रु.२३०० ऐवजी रु.२२५० मूळ वेतन करुन (रु.५० ने कमी करुन) काढलेल्या पगाराचा फरक मिळावा. तसेच कालबध्द पदोन्नतीप्रमाणे नवीन वेतननिश्चिती होऊन दि.२८.२.१९९९ पर्यंतचा फरक मिळावा. | |

## विवेचन

सुधारित वेतनश्रेणी व त्यानुसार निवृत्तीवेतन मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. मधुकर रामचंद्र बवरे यांनी जन माहिती अधिकारी तथा कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत श्री.बवरे यांची मागणी येत नसूनही जन माहिती अधिकारी तथा कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा कृषि उपसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी त्यांच्या मागणीविषयी केल्या जात असलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना दिली. परंतु या माहितीने समाधान न झाल्याने श्री.बवरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कृषि उपसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे अपील केले. वेतन पडताळणी पथक, पुणे यांच्याकडून वेतन पडताळणी करुन प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करुन माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.बवरे यांना कळविले. श्री.बवरे सन १९८७ पासून हा विषय मांडत असून फेब्रुवारी १९९९ मध्ये ते निवृत्त झाले. दि.१.७.१९८३ पासून आपल्याला कशा प्रकारे वेतननिश्चिती करुन मिळावी याच्या विकल्पानुसार श्री.बवरे करीत आलेली मागणी हा या अपिलाचा मुख्य विषय आहे. त्याबाबत केल्या जात असलेल्या कार्यवाहीची

माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना वेळोवेळी दिलेली आहे. त्यांच्या वेतन पडताळणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करुन सुधारित निवृत्ती वेतननिश्चिती व त्यानुसार अन्य आर्थिक बाबींसंबंधीची कार्यवाही केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी तथा कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे श्री.सो.द.शेलार यांनी लेखी व तोंडी आयोगाला सादर केली. त्यानुसार दि.६.१०.२००७ रोजी संपूर्ण कार्यवाही झालेली असल्यामुळे आपली तक्रार राहिलेली नाही व करण्यात आलेली वेतननिश्चिती बरोबर आहे, असे श्री.बवरे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ पुणे**

**पुणे**
**दि.१०.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी धोंडीभाऊ हिंगे
मु.पो. अवसरी बु., ता. आंबेगाव, — अपीलकर्ता
जि. पुणे - ४१२ ४०६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार आंबेगाव, ता.आंबेगाव,
जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | सुनावणीची तारीख | दि. २०.२.२००८ |

२ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी धोंडीभाऊ हिंगे
मु.पो. अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२ ४०६

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगाव, ता.आंबेगाव,
जि. पुणे श्री. दत्तात्रय ब. कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव,
ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. दिगंबर पोपट रौंधळ

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३३८/ पुणे | ८.४.२००६ | २६.५.२००६ | २१.६.२००६ | २७.७.२००६ |
| ७८८/ पुणे | ९.१.२००७ | २९.१.२००७ | १२.२.२००७ | ३०.३.२००७ |
| १११६ / पुणे | २५.५.२००७ | ४.६.२००७ | ४.७.२००७ | २१.८.२००७ |
| १२४१ / पुणे | -- | -- | -- | २३.८.२००७ |
| ३४९ / पुणे | ८.४.२००६ | २६.५.२००६ | -- | ५.८.२००६ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. ३३८/ पुणे + ३४९ / पुणे**

(कालावधी दि. १ जानेवारी २००५ ते ३० एप्रिल २००६)

आंबेगाव तालुका रेशनिंग दुकानदारांची १ ते ३४ अनुक्रमांकामध्ये, तसेच गोडाऊनमधील संपूर्ण नमुन्यात तपशील, आंबेगाव तालुका येथील रॉकेल दुकानदारांचा रॉकेल तक्ता अ.क्र.१ ते १० मध्ये नमुन्यात, तसेच प्रत्येक महिन्याची ऑफिसची माहिती

**अपील क्र. ७८८/ पुणे**

(कालावधी दि. १ जानेवारी १९९६ ते ३१ डिसेंबर २००६ )

आंबेगाव तालुक्यातील स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदारांकडून प्रत्येक महिनावार माहिती १ ते १२ नमुना तक्त्यात

**अपील क्र. १११६/ पुणे** (कालावधी जानेवारी १९९८ ते २५ मे २००७ )

जानेवारी १९९८ ते २५.५.२००७ पर्यंत केरोसिन दुकानदारांचे नूतनीकरण केलेले परवाने, नूतनीकरणात प्राप्त न झालेले, केरोसीन पुरवठा बंद केलेले, त्याचप्रमाणे केरोसीन परवाना नसताना केरोसीन पुरवठा केलेल्या दुकानदारांची नावे व दिलेल्या कोट्यांची माहिती, तसेच यापूर्वी पुरवठा निरीक्षक यांनी प्रत्येक वर्षी परवानाधारक यांना नूतनीकरणासाठी नोटिसा पाठविल्या होत्या किंवा नाही याबाबत प्रत्येक दुकानदारांचा लायसन्स क्र. व रक्कम अनामत व नूतनीकरण फी, चलनाची माहिती

## विवेचन

आंबेगाव तालुक्यातील रेशनिंग दुकानांच्या संदर्भात दि. १.१.११९६ ते दि. २५.५.२००७ या काळातील रॉकेल पुरवठा, नूतनीकरण परवाने आदींची माहिती अपीलकर्ता श्री. शिवाजी धोंडीभाऊ

हिंगे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव, जि. पुणे यांच्याकडे पाच अर्जाद्वारे मागितली होती. वर नमूद केल्याप्रमाणे विविध कालावधीतील माहिती मागणाऱ्या या अर्जांनुसार आवश्यक ती व मागितलेल्या नमुन्यानुसार माहिती न मिळाल्यामुळे श्री. हिंगे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांच्या निर्णयानेही समाधान न झाल्याने श्री. हिंगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

श्री. हिंगे स्वतः रेशन दुकानदार आहेत. आपल्यावर अन्याय करून आपले दुकान काढून घेण्यात आले, ही त्यांची मुख्य तक्रार आहे, मात्र त्याबाबतच्या कार्यवाहीची मागणी त्यांनी केलेली नाही. आंबेगाव तालुक्यात रेशन दुकानांमध्ये धान्य, साखर, रॉकेल यांच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे, त्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते, असे प्रतिपादन श्री. हिंगे यांनी केले. श्री. हिंगे यांच्या प्रत्येक अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले आहे, मात्र मोठ्या प्रमाणावर, वेगवेगळ्या स्वरूपाचे तक्ते करून देऊन त्यानुसार माहिती देण्याची मागणी श्री. हिंगे करीत असतात. तरीही शक्य तेवढ्या नमुन्यांमध्ये त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव जि. पुणे श्री. दिगंबर पोपट रौंधळ यांनी सांगितले. ज्या विशिष्ट नमुन्यांमध्ये संकलन करून श्री. हिंगे यांनी माहिती मागितली आहे त्या तक्त्यांच्या प्रती कागदपत्रांसोबत सादर करण्यात आल्या आहेत.

श्री. हिंगे सातत्याने हा विषय मांडत असून तहसील कार्यालयापासून अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांपर्यंत विविध पातळ्यांवर मोठ्या प्रमाणावर अर्ज / निवेदने आदि पत्रव्यवहार ते करीत आले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांनी केलेले अर्ज हा त्यातीलच एक भाग आहे. आपल्याला माहितीसाठी वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे शुल्क कळविण्यात आले व तेही भरुन घेण्यास टाळाटाळ करण्यात आली, असे श्री. हिंगे यांनी नमूद केले. परंतु श्री. हिंगे यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रतींचा तपशील त्यांना देऊन रुपये ३१५०२/- एवढे शुल्क त्यांना कळविण्यात आले. कळविलेले शुल्क ते कधीही भरत नाहीत. तसेच निःशुल्क पाठविलेली माहिती स्वीकारीत नाहीत. याबाबत वेळोवेळी त्यांना पत्र पाठवून स्मरण देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. दिगंबर पोपट रौंधळ व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव श्री. दत्तात्रय ब. कवितके यांनी सांगितले. स्मरणपत्रांच्या व अन्य पूरक कागदपत्रांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. 'श्री. हिंगे यांनी

आतापर्यंत पुरवठा विषयक माहित्या त्यांनी दिलेल्या विशिष्ट नमुन्यांतच मिळणेबाबत वारंवार अर्ज केलेले आहेत. तथापि संपूर्ण तालुक्यामध्ये एकूण सुमारे १२० केरोसीन विक्रेते व ८५ स्वस्त धान्य परवानाधारक असून या सर्वांना प्रत्येक महिन्यात केरोसीनचे वितरण, धान्याची मागणी पत्रके मंजूर करणे, धान्याच्या किंमतीची चलने मंजूर करून देणे, त्यानंतर परमिट लिहिणे व मंजूर करून देणे, तसेच वरील सर्व विषयांचे लेखे लिहिणे व ते वरिष्ठ कार्यालयास अहवाल स्वरूपात दरमहा सादर करणे, नविन रेशनकार्डचे अर्ज प्रक्रिया करून कार्ड तयार करून देणे, युनिट्स कमी-जास्त करून देणे इत्यादी सर्व कामे करणेसाठी तहसील कार्यालयामध्ये एकच कर्मचारी पुरवठा शाखेत उपलब्ध आहे. त्याच्या दैनंदिन कामकाजाचा व्याप पाहता अर्जदाराने दिलेल्या क्लिष्ट स्वरूपाच्या नमुन्यात त्यांना माहित्या संकलित करून देणे अत्यंत कठीण असल्यामुळे आतापर्यंत त्यांना कार्यालयात उपलब्ध असलेल्या स्वरूपात माहित्या देणेत आलेल्या आहेत. व ज्या ठिकाणी नमुन्यात माहिती देणे शक्य असेल तेथे संकलित करून नमुन्यात दिली आहे. अर्जदार हे वारंवार माहिती अधिकारांतर्गत अर्ज करण्याचे सवयीचे असून त्यांनी वरील द्वितीय अपिलांव्यतिरिक्त या कार्यालयाकडे विविध तलाठ्यांनी / माहिती अधिकारी यांनी दिलेल्या महित्यांवर अन्य ६० प्रथम अपिले या विषयाबाबत केलेली आहेत,' असे निवासी नायब तहसीलदार श्री. रौंधळ व तहसीलदार श्री. कवितके यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले. श्री. हिंगे यांना माहिती मिळण्यात स्वारस्य आहे, की पुरवठा शाखेस त्रास देणे व दबाव आणणे हाच त्यांचा उद्देश आहे, असा प्रश्न श्री. रौंधळ व श्री. कवितके यांनी उपस्थित केला. बराच पत्रव्यवहार केल्यानंतर श्री. हिंगे यांनी दि. २७.११.२००६ रोजी शुल्क भरले, असे त्यांनी नमूद केले. आपण शुल्क भरण्यास तयार होतो, परंतु ते घेण्यास टाळाटाळ केली गेली. एकदा माहिती म्हणून फाटके कागद पाठविले गेले. शिपायाच्या हस्ते पाठविलेली माहिती तपासून घेण्याचा अवधी आपल्याला दिला गेलेला नाही. आपण पैसे भरले नसताना दि. ८.१.२००७ रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली गेली, ते पैसे कोणी भरले, असा मुद्दा श्री. हिंगे यांनी उपस्थित केला. आधी माहिती व फाटके कागद पाठविले असल्यामुळे व या रजिस्टर्ड टपालामध्ये काय आहे याची तपासणी आयोगासमोर व्हावी म्हणून आपण हे टपाल फोडलेले नाही, असे श्री. हिंगे यांनी सांगितले व न फोडलेले रजिस्टर्ड टपाल सादर केले. दि. ८.१.२००७ रोजी मिळालेले टपाल सुनावणीच्या दिवसापर्यंत म्हणजे दि. २०.२.२००८ पर्यंत अपीलकर्ता फोडत नाही, यावरूनही त्यांना

माहिती घेण्यात स्वारस्य आहे की अन्य काही उद्देश आहे, असा प्रश्न पडतो. श्री. हिंगे यांनी १९९६ पासून २००७ पर्यंतची अशी विस्तृत माहिती मागितली आहे. संबंधित कोणतीही कागदपत्रे दाखविण्यास आपण या पूर्वीही तयारी दर्शविली असून आजही आपला प्रस्ताव कायम आहे. श्री. हिंगे यांनी संबंधित अभिलेखाचे अवलोकन करून त्यातील त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्वरित दिल्या जातील, असे प्रतिपादन श्री. रौंधळ व श्री. कवितके यांनी केले. आपण हे टपाल इतके दिवस का फोडले नाही याचे समाधानकारक उत्तर श्री. हिंगे देऊ शकले नाहीत. ते फोडून पाहिले असता आत माहितीविषयक कागदपत्रे चांगल्या स्थितीत असल्याचे आढळले.

तत्कालीन तालुका पुरवठा निरीक्षक श्री. धनंजय दत्तात्रय भांगरे यांच्या विरुध्द श्री. हिंगे यांचा मुख्य आक्षेप आहे, असे नमूद करून तहसीलदार श्री. कवितके यांनी त्यांची बदली झाली असल्याचे सांगितले. त्यांच्याविरूध्द आपली तक्रार आहेच. परंतु ती वैयक्तिक नसून सार्वजनिक अन्न धान्य वितरण व्यवस्थेत आवश्यक नोंदींची कागदपत्रे न ठेवता केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचाराविरूध्द आहे, असे श्री. हिंगे यांनी स्पष्ट केले.

श्री. हिंगे यांचे अर्ज व अपिलांचे प्रमाण, त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व विशिष्ट नमुन्यातच सर्व माहितीचे संकलन करून देण्याचा आग्रह याचा विचार करता व तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेकडील मनुष्यबळ लक्षात घेता त्या स्वरूपात माहिती देता येणे शक्य नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन रास्त आहे. तसेच वेळोवेळी त्यांच्या अर्जांवर उत्तरे देण्यात आली आहेत. कळविलेले शुल्क श्री. हिंगे यांनी त्या त्या वेळी भरलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्तीची त्यांची मागणी समर्थनीय ठरत नाही. मात्र तालुक्यात १२० केरोसीन विक्रेते व ८५ स्वस्त धान्य दुकानधारक असले तरी धान्य, साखर, केरोसीन आदींबाबत संपूर्ण तपशील असलेले रजिस्टर दैनंदिन स्वरूपात भरले जाणे व त्याची तपासणी होणे कायद्याने बंधनकारक आहे. अशा स्थितीत, काही दुकानदारांबाबतची अशी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही, असे उत्तर साखरेसारख्या अनेक बाबतीत दिले आहे. याचे कारण काही दुकानदारांबाबतच्या नियमित नोंदी ठेवलेल्या नाहीत. त्या त्या दुकानदारांनी ठेवलेल्या नोंदींची तपासणी केलेली नाही. पुरवठा निरीक्षकांनी आवश्यक ती दैनंदिनी ठेवलेली नाही, याचाच अर्थ नियमानुसार आवश्यक असलेली माहिती योग्य प्रकारे ठेवलेली नाही व नागरिकांना ती उपलब्ध

माहिती घेण्यात स्वारस्य आहे की अन्य काही उद्देश आहे, असा प्रश्न पडतो. श्री. हिंगे यांनी १९९६ पासून २००७ पर्यंतची अशी विस्तृत माहिती मागितली आहे. संबंधित कोणतीही कागदपत्रे दाखविण्यास आपण या पूर्वीही तयारी दर्शविली असून आजही आपला प्रस्ताव कायम आहे. श्री. हिंगे यांनी संबंधित अभिलेखाचे अवलोकन करून त्यातील त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्वरित दिल्या जातील, असे प्रतिपादन श्री. रौंधळ व श्री. कवितके यांनी केले. आपण हे टपाल इतके दिवस का फोडले नाही याचे समाधानकारक उत्तर श्री. हिंगे देऊ शकले नाहीत. ते फोडून पाहिले असता आत माहितीविषयक कागदपत्रे चांगल्या स्थितीत असल्याचे आढळले.

तत्कालीन तालुका पुरवठा निरीक्षक श्री. धनंजय दत्तात्रय भांगरे यांच्या विरुध्द श्री. हिंगे यांचा मुख्य आक्षेप आहे, असे नमूद करून तहसीलदार श्री. कवितके यांनी त्यांची बदली झाली असल्याचे सांगितले. त्यांच्याविरूध्द आपली तक्रार आहेच. परंतु ती वैयक्तिक नसून सार्वजनिक अन्न धान्य वितरण व्यवस्थेत आवश्यक नोंदींची कागदपत्रे न ठेवता केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचाराविरूध्द आहे, असे श्री. हिंगे यांनी स्पष्ट केले.

श्री. हिंगे यांचे अर्ज व अपिलांचे प्रमाण, त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व विशिष्ट नमुन्यातच सर्व माहितीचे संकलन करून देण्याचा आग्रह याचा विचार करता व तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेकडील मनुष्यबळ लक्षात घेता त्या स्वरूपात माहिती देता येणे शक्य नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन रास्त आहे. तसेच वेळोवेळी त्यांच्या अर्जांवर उत्तरे देण्यात आली आहेत. कळविलेले शुल्क श्री. हिंगे यांनी त्या त्या वेळी भरलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्तीची त्यांची मागणी समर्थनीय ठरत नाही. मात्र तालुक्यात १२० केरोसीन विक्रेते व ८५ स्वस्त धान्य दुकानधारक असले तरी धान्य, साखर, केरोसीन आदींबाबत संपूर्ण तपशील असलेले रजिस्टर दैनंदिन स्वरूपात भरले जाणे व त्याची तपासणी होणे कायद्याने बंधनकारक आहे. अशा स्थितीत, काही दुकानदारांबाबतची अशी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही, असे उत्तर साखरेसारख्या अनेक बाबतीत दिले आहे. याचे कारण काही दुकानदारांबाबतच्या नियमित नोंदी ठेवलेल्या नाहीत. त्या त्या दुकानदारांनी ठेवलेल्या नोंदींची तपासणी केलेली नाही. पुरवठा निरीक्षकांनी आवश्यक ती दैनंदिनी ठेवलेली नाही, याचाच अर्थ नियमानुसार आवश्यक असलेली माहिती योग्य प्रकारे ठेवलेली नाही व नागरिकांना ती उपलब्ध

करून दिली जात नाही, हे श्री. हिंगे यांचे म्हणणे रास्त आहे. काही माहिती दिली गेलेली आहे, अन्य माहिती अथवा संबंधित कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही, अशा स्वरूपाची उत्तरे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहेत, ती समर्थनीय नाहीत. नियमानुसार ठेवली जाणे आवश्यक असणारी सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध असलीच पाहिजे, ती उपलब्ध करुन न देण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूध्द कारवाई केली गेली जाईल, असे श्री. रौंधळ व श्री. कवितके यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. नियमित नोंदी ठेवून मागितल्यास ती माहिती दिली जाणे आवश्यक आहे, तसेच नोंदी न ठेवण्याद्वारे अशी माहिती दडवून ठेवणे, नाकारणे याला शासन होणे- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणांमधील पारदर्शकतेच्या व उत्तरदायित्वाच्या तत्त्वासाठी आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले अंशतः मान्य.

२. श्री. हिंगे यांनी आपल्याला हव्या असलेल्या माहितीचा नेमका मुद्देनिहाय तपशील कोणत्याही भाष्याविना जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करावा. त्यांनी हा तपशील दिल्यापासून १५ दिवसात अभिलेखातील माहिती आहे त्या स्वरूपात जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. हिंगे यांना निःशुल्क द्यावी.

३. नियमानुसार ठेवणे आवश्यक असलेली माहिती / कागदपत्रे ठेवली न जाणे हे नागरिकांचा माहितीचा अधिकार डावलणे आहे. अशा प्रकारे त्या त्या कालावधीतील माहिती उपलब्ध न ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासकीय सेवा नियमातंर्गत कारवाई करून त्याबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव यांनी दि. १०-५-२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंठपीठ, पुणे

पुणे
दि. ७.३.२००८

प्रत : उपविभागीय अधिकारी, मंचर उपविभाग जुन्नर,जि. पुणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ
घ.नं.१४७, नागेश्वर गृह संस्था, सहकार नगर,
पुणे-४११ ००९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद,
लोणावळा, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४७ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३.१२.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १२.४.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ यांनी लोणावळा नगरपरिषद हद्दीतील घरांक ३२४-ए ही मिळकत अतिजीर्ण १०० वर्षांपूर्वीची असल्याने धोकादायक बांधकाम समक्ष तपासून जमीनदोस्त करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. संकपाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने आयोगाच्या दि. २७ फेब्रुवारी २००८ चे पत्रानुसार 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत' दि. १९.३.२००८ रोजी संबंधितांना उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर मिळकत दि. १६.२.२००८ रोजी विकसित करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाच्या ताब्यात दिली असून दि. २४.२.२००८ रोजी जमीनदोस्त केली असल्याने आपली आता तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्ता श्री. संकपाळ यांनी दि. १.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ
घ.नं.१४७, नागेश्वर गृह संस्था, सहकार नगर,
पुणे-४११ ००९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद,
लोणावळा, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४७ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३.१२.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १२.४.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ यांनी लोणावळा नगरपरिषद हद्दीतील घरांक ३२४-ए ही मिळकत अतिजीर्ण १०० वर्षांपूर्वीची असल्याने धोकादायक बांधकाम समक्ष तपासून जमीनदोस्त करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. संकपाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने आयोगाच्या दि. २७ फेब्रुवारी २००८ चे पत्रानुसार 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत' दि. १९.३.२००८ रोजी संबंधितांना उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर मिळकत दि. १६.२.२००८ रोजी विकसित करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाच्या ताब्यात दिली असून दि. २४.२.२००८ रोजी जमीनदोस्त केली असल्याने आपली आता तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्ता श्री. संकपाळ यांनी दि. १.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि. २८.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४४ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. विश्वनाथ मारुती गोरे<br>धनगर समाज धर्मशाळा, खोली क्र. ३१२,<br>घुंडरेअळी, चाकण रोड, आळंदी, ता. खेड, जि. पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, ता. पुरंदर, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, ता. पुरंदर, जि.पुणे |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उर्वरित माहिती मार्च २००८ अखेर देणार आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी पूर्तता अहवाल आठ दिवसात आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१ .३.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१) श्री. संजय दत्तात्रय भालघरे,
(२) श्री.सूर्यकांत धोंडिबा बाठे
मु. पो. केंजळ, ता. भोर, जि. पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भोर, ता. भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५५+४५७+४६० / सोलापूर-पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** (१) श्री. संजय दत्तात्रय भालघरे,
(२)श्री.सूर्यकांत धोंडिबा बाठे, मु. पो. केंजळ, ता. भोर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
तर्फे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, पुणे
श्री.संजय मस्कर

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोर
ता. भोर, जि. पुणे श्री. चंद्रकांत वाघमारे

विकास अधिकारी(पंचायत), पंचायत समिती भोर श्री. अे.एस. देसाई

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४५७/पुणे | दि. ७.२.२००६ | दि. ७.२.२००६ | दि. २०.३.२००६ | दि. १५.४.२००६ |
| ४६०/पुणे | दि. ७.२.२००६ | दि. २१.२.२००६ | दि. १७.३.२००६ | दि. २०.४.२००६ |
| ४५५/पुणे | दि.७.२.२००६ | दि.२१.२.२००६ | दि.१७.३.२००६ | दि.१५.४.२००६ |

## ८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

### अपिल क्र. ४५७

बाल फार्मा. लि. युनिट ३, केंजळ यांची कराची फेर आकारणी सन २००३ ते २००४ या कालावधीत केलेली आहे असे गटविकास अधिकाऱ्याच्या पत्रात नमूद असून त्या फेर आकारणी बाबतच्या कागदपत्राच्या नकला. गटविकास अधिकारी कार्यालयाने निर्णय देण्यापूर्वी सरपंच, ग्रामपंचायत, केंजळ यांना विचारणा केली आहे काय. त्या विषयी माहिती व त्या कागदपत्रांच्या नकला, कार्यालयाने कोणत्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय दिलेला आहे या विषयी कागदपत्रांच्या नकला.

### अपिल क्र.४५५+४६०

भोर तालुक्यातील ३७ गावे ३१ डिसेंबर २००५ अखेर हागणदारीमुक्त झालेली आहेत. अशा हागणदारी मुक्त गावांची नावे व सन २००५ ते २००६ च्या कालावधीतील या ३७ गावांचा प्रस्ताव शासनास पाठविलेला असून सदर प्रस्तावाच्या नकला

# विवेचन

भोर तालुक्यातील हागणदारीमुक्त ३७ गावांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.सूर्यकांत धोंडिबा बाठे (अपील क्र.४५५) व श्री.संजय दत्तात्रय भालघरे (अपील क्र.४६०) यांनी मागितली होती. या गावाबाबतच्या शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या. परंतु ही माहिती ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांकडून मिळेल, त्यांना तसे कळविण्यात आले आहे, असे नमूद करुन गटविकास अधिकारी यांनी अर्ज दप्तरी दाखल केला. त्याविरुध्द श्री.बाठे व श्री.भालघरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे अपील केले. पंचायत समिती स्तरावर विस्तार अधिकारी (पंचायत) हे जन माहिती अधिकारी व गटविकास अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी असल्याचेही गटविकास अधिकाऱ्यानी त्यांना कळविले.

बाल फार्मा लि.युनिट-३ या कंपनीला कर आकारणीबाबत गटविकास अधिकारी कार्यालयाने दिलेल्या पत्राबाबत सरपंच व ग्रामपंचायत, केंजळ यांना विचारणा केली आहे काय, त्या कागदपत्रांच्या नकला मिळाव्यात, अशी मागणी श्री.भालघरे यांनी अन्य एका अर्जाद्वारे (अपील क्र.४५७) केली होती. 'महाराष्ट्र माहितीच्या अधिकारात ग्रामपंचायत किंवा तालुका स्तरावरील माहिती संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी हे अपिलीय अधिकारी नाहीत. ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक हा शासकीय माहिती अधिकारी आहे. आपणांस आवश्यक असलेली माहिती ही ग्रामपंचायत स्तरावर असल्याने संबंधित ग्रामपंचायतीकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच जर संबंधित ग्रामसेवकाने माहिती न दिल्यास तालुका स्तरावर प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी याची नेमणूक केलेली आहे,' असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी श्री.भालघरे यांना कळविले.

श्री.भालघरे हे केंजळ गावचे सरपंच आहेत. हे तीनही अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ अन्वये करण्यात आलेले होते. आपल्याला योग्य माहिती दिली जात नसल्याच्या कारणावरुन श्री.बाठे व श्री.भालघरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

हागणदारीमुक्त गावाबाबतचे प्रस्ताव शासनाची फसवणूक करणारे आहेत, असा दावा श्री.भालघरे यांनी केला. केंद्राने निश्चित केलेल्या नमुन्यात तयार असलेले प्रस्ताव देऊ केले असता श्री.भालघरे यांनी ते घेतले नाहीत, असे प्रतिपादन गटविकास अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे यांनी केले. श्री.भालघरे यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याबाबत गल्लत करुन अर्ज व अपील केले आहे, असेही श्री.वाघमारे यांनी प्रतिपादन केले. मात्र जन माहिती अधिकारी म्हणून मूळ अर्जाची दखल विस्तार अधिकाऱ्यांनी घेण्याऐवजी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.विनायक वामन चव्हाण यांनी (सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी) त्याचे उत्तर दिले आहे, असेही विद्यमान गटविकास अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संबंधित प्रस्तावाच्या प्रती तयार असून त्या आपण ग्रामपंचायतीला त्वरित देऊ शकतो, असेही श्री.वाघमारे यांनी सांगितले.

बाल फार्मा कंपनी बाबत श्री.भालघरे यानी ज्या पत्राची प्रत मागितली आहे, ते पत्र पाठविले गेलेलेच नाही, असे श्री.वाघमारे यांनी सांगितले. मात्र कंपनीला असे पत्र मिळाले असून त्याची प्रत उपलब्ध असल्याचे श्री.भालघरे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह निदर्शनास आणले. हा विषयही जन माहिती अधिकारी म्हणून बिस्तार अधिकारी (पंचायत) श्री.ए.एस.देसाई यांनी न हाताळता तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.विनायक वामन चव्हाण यांनी हाताळला आहे, असे श्री.वाघमारे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. याच अनुषंगाने श्री.देसाई यांनी दि.१५.१०.२००७ रोजी आयोगाला निवेदन सादर केले. माहिती अधिकारी म्हणून काम करण्याचा आदेश आपल्याला अद्यापपर्यंत मिळालेला नाही. पंचायत समिती कार्यालयातील फलकावरही माहिती अधिकारी म्हणून श्री.एस.के.कुंभार यांचे व सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून आपले नांव दर्शविलेले आहे. त्यामुळे आपण संभ्रमात आहोत, असे नमूद करुन श्री.देसाई यांनी या निवेदनात म्हटले आहे, अपिलदाराने माहितीसाठी अर्ज कधी व केव्हा पंचायत समिती कार्यालयाकडे दाखल केले याची

मला माहिती नाही वा नव्हती. गटविकास अधिकारी यांना अग्रेषित करुन माहिती मागितलेली दिसून येत आहे. संबंधित अपिलदाराला माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा कसे याबाबत मला लेखी अथवा तोंडी सूचना गटविकास अधिकारी यांनी दिलेली नाही व नव्हती. स्वतःच्या अधिकारात गटविकास अधिकारी यांनी संबंधितांस कळविले आहे. त्याबाबत मला माहिती नाही व नव्हती. सदर अपिलदाराने गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती व अपिल फेटाळलेने आपणाकडे अपिल केलेले आहे. त्यात माझा माहिती अधिकारी म्हणून काही संबंध दिसून येत नाही.'

या विषयातील मूळ प्रश्न कंपनीकडून कर वसूल करण्याचा आहे. सन २००० ते २००३ पर्यंत केजळ ग्रामपंचायत या कंपनीला रु.६५०००/- वार्षिक कर आकारत होती. सन २००३-२००४ मध्ये ग्रामपंचायतीने फेरआकारणी करुन ही रक्कम रु.८७०००/- पर्यंत वाढविली. सन २००४-२००५ मध्येही ग्रामपंचायतीने एवढाच कर आकारला. 'ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार फेरआकारणीत चार वर्षांनी पुनश्च फेरआकारणी करुन कर निश्चित करावा. सध्या नव्याने फेरआकारणी करुन कर निश्चित करण्यात येऊ नये,' असे श्री.चव्हाण यांची सही असलेल्या पत्रात म्हटले आहे. सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत केंजळ, ता.भोर, जि.पुणे यांना उद्देशून असलेल्या या पत्राची गटविकास अधिकारी कार्यालयाच्या जावक बारनिशीमध्ये नोंद आढळून येत नसल्याचे श्री.वाघमारे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ग्रामपंचायतीशी विचारविनिमय केल्याशिवाय, तसेच ग्रामपंचायतीने कोणताही ठराव अथवा मागणी केली नसताना श्री.चव्हाण यांनी फेरआकारणीबाबतचे पत्र कसे दिले, असा श्री.भालघरे यांचा आक्षेप आहे. सादर करण्यात आलेले पत्र अधिकृत नाही. श्री.चव्हाण यांनी हे पत्र तयार केले होते, परंतु ते कंपनीला दिले गेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.अे.अेस.देसाई यांनी सांगितले. नंतर हे पत्र रद्द करण्यात आले. परंतु अनधिकृत पत्राचा आधार घेऊन कंपनी न्यायालयात गेली आहे, असेही श्री.वाघमारे व श्री.देसाई यांनी नमूद केले. मात्र हे पत्र ग्रामपंचायतीला न मिळता कंपनीला

कसे मिळाले? हा सर्व प्रकार संशयास्पद आहे. कंपनी व गटविकास अधिकारी हे एकत्र येऊन ग्रामपंचायतीचा कर बुडवीत आहेत, असा आरोपही श्री.भालघरे यानी केला.

गटविकास अधिकारी व संबंधित कंपनी यांच्यामध्ये झालेल्या थेट पत्रव्यवहारानंतर गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात तयार झालेले पत्र ग्रामपंचायतीला अंधारात ठेवून कंपनीपर्यंत पोहोचले आणि त्या आधारे सुमारे ३,३५,०००/- इतक्या रकमेचा कर दि.३१.३.२००६ अखेर बुडविला गेला आहे, असा श्री.भालघरे यांचा दावा आहे. गटविकास अधिकारी पत्र तयार करतात, ग्रामपंचायतीची मागणी अथवा ठराव नसताना अनधिकृतरीत्या ते कंपनीला मिळते आणि त्यानंतर ते रद्द केल्याचे कंपनीला कळविले जाते, या सर्व पत्रव्यवहाराबाबत ग्रामपंचायतीला काहीही कळविले जात नाही, ही सर्व माहिती श्री.भालघरे यांच्या आरोपाच्या संदर्भात महत्त्वाची आहे.

अपील क्र.४५५+४६० मध्ये अपेक्षित असलेल्या हागणदारीमुक्त गावांच्या प्रस्तावाच्या प्रती अपीलकर्त्यास त्वरित द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार या प्रती देण्यात आल्या.

अपील क्र.४५७ बाबत बाल फार्मा लि. युनिट क्र.३ केंजळ या कंपनीच्या कर आकारणीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यास त्वरित देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. मात्र आपल्याला चार पानांची माहिती मिळाली असून ती खोटी आहे, असे श्री.भालघरे यांनी दि.१५.१०.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. कराच्या फेरआकारणीबाबत कोणती प्रक्रिया अवलंबिली जाते हे या निवेदनात विस्ताराने नमूद केले असून त्यानुसार प्रक्रिया पार पाडली गेलेली नाही, असे प्रतिपादन केले आहे. हा प्रशासकीय कार्यवाहीचा व अन्वयार्थाचा विषय असून माहितीचा अधिकार २००५ च्या कक्षेत येत नाही. नियमबाह्य प्रक्रिया अवलंबून कृती केली गेली असल्यास सक्षम मंचाकडे श्री.भालघरे दाद मागू शकतात. मात्र कोणत्या नियमांच्या व कागदपत्रांच्या आधारे कृती केली गेली ही माहिती मिळण्याचा अपीलकर्त्याचा हक्क आहे.

जनमाहिती अधिकारी नेमके कोण, याबाबत विस्तार अधिकारी श्री.देसाई यांनी नमूद केलेली संभ्रमावस्था व जनमाहिती अधिकाऱ्याऐवजी अपिलीय प्राधिकारी असणारे गटविकास अधिकारी श्री.विनायक वामन चव्हाण यांनी स्वत:च्याच पातळीवर अर्जावर कार्यवाही करणे आक्षेपार्ह व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अपेक्षित प्रक्रियेशी विसंगत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अंशत: मान्य.

(२) तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.विनायक वामन चव्हाण यांनी बाल फार्मा युनिट ३ या कंपनीबाबत कोणत्या नियमान्वये फेरआकारणीबाबत निर्णय केला, याची माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास त्वरित द्यावी. तसेच अनधिकृत पत्र संदर्भित कंपनीला पोहोचण्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे, माहिती मागणीच्या अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर न देता अपिलीय प्राधिकारी असलेल्या गटविकास अधिकाऱ्यांनीच उत्तर देण्याची कारणे कोणती, या बाबींचा खुलासा होणे माहितीच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी या संदर्भात सखोल चौकशी करुन दिनांक १०.४.२००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि.७.३.२००८